R.N.I. No. : UPBIL/2009/27081
Indexed - USA
ProQuest

ISSN : 0976-1136
ICRJIFR,
Impact Factor:
9.9901
Volume- 69, Issue- 2,
January-March, 2026

# DELIBERATIVE® RESEARCH

Peer Reviewed, Refereed, Multidisciplinary
Quarterly Bilingual International Journal

International Editors -
India, USA, Romania, Brazil, Ukraine, Portugal, Italy,
Philippines, Hong Kong, Vietnam, Greece, Thailand

Editor-in-Chief
Dr. Amit Jain
(M.Com, Ph.D, MSW, LLB)

# DELIBERATIVE RESEARCH

(International, Peer Reviewed, Refereed, Double Blind, Multidisciplinary Quarterly International Journal)

Deliberative Research an International Multi disciplinary Journal. Its special approach for Social Sciences and Humanities and aims at providing a healthy forum for scholarly and literary display on socio-political and other paradigms of social relevance as reflected in contemporary Indian Society or world forum. We will also focus on Money Matters, Policies, Strategies and Planning.

R.N.I. No.: UPBIL/2009/27081

ISSN- 0976-1136

Volume – 69, Issue – 2, January-March, 2026

## Published By

AIIFJ

## Amit International Impact Factor Journals

Correspondence Address-
439, Indra Colony, Street No. 4, Repura Road,
Firozabad, Uttar Pradesh, India
Mob- 9837208441, 9045311021
Website- www.amitdeliberativeresearch.com
Email- dr.amit0190@gmail.com

# DELIBERATIVE RESEARCH

(Peer Reviewed, Refereed,
Multidisciplinary Quarterly Bilingual International Journal)

## INDEX

| S.No. | Research Papers | Pages |
|---|---|---|
| 1. | **A Brief Description on Research Methodology**<br>Dr. Amit Jain | 1-5 |
| 2. | **Gender, Sexuality, and Intersectionality: New Perspectives on Identity and Inclusion**<br>Prof. Dr. Akshata Amit Kumar Gawade | 6-11 |
| 3. | **The Social Impact of the Gig Economy: Work, Rights, and Livelihoods in India**<br>Mr. Sagar N. Chaure, Dr. Mahendrakumar Jadhav | 12-18 |
| 4. | **Inequalities in Urban Economy in India**<br>Dr. Shivaji F. Bothikar | 19-21 |
| 5. | **The Case of 10-minute Delivery Protests in Maharashtra : A Sociological Perspective**<br>Dr. Ghatage Jayant Chandrakant | 22-26 |
| 6. | **Adaptability of Humans and Mental Health in the Post-COVID World**<br>Samruddhi Sanjay Kumar Chavan,<br>Prof. Dr. Mahendra Kumar Ananadrao Jadhav | 27-30 |
| 7. | **Export and Import Performance of Fruits And Vegetables Commodities In India**<br>Dr. Rohit Dinkar Barsing[1], Dr. Samina S. Jamadar[2],<br>Dr. Sarika Namdeo Shinde[3] | 31-36 |
| 8. | **A Critical Study of AI Integration and Digital Divide in India**<br>Abhijeet Ashok Kamble | 37-41 |
| 9. | **Educational Metamorphosis: The Influence of Indian Society in Transition on Pedagogical and Institutional Frameworks**<br>Dr. Ashok Gulabrao Jadhav | 42-45 |
| 10. | **Green Waves in Transition: Leveraging Marketing for A Sustainable Societal Shift**<br>Prof. Seema Shashikant Kadam | 46-50 |
| 11. | **Unlocking the Potential of Konkan: A Comprehensive Study on Tourism Development and Community Participation**<br>Dr. Mahendrakumar A. Jadhav | 51-54 |
| 12. | **The Impact of Artificial Intelligence on Human Society and Bioethics**<br>Dr. Surekha.S.Awate | 55-60 |
| 13. | **Research Paper on Sociology of Artificial Intelligence**<br>Dr. Savita Madhavrao Gire | 61-65 |
| 14. | **Post Pandemic Society and It's Pathway to Recovery**<br>Dr. Latika Sandeep Shevade, Prof. Dr. Archana Jagatkar (Kamble) | 66-70 |

| S.No. | Research Papers | Pages |
|---|---|---|
| 44. | **Study of the Benefits of Artificial Intelligence (AI) for Teachers in Teaching and Research Paper Writing**<br>Nirmala Pokhamikar, Jenifer Dsouza | 237-241 |
| 45. | **Urbanisation and Solid Waste Management in Panjim City: A Perception-Based Comparative Study of Households and Restaurants**<br>*Miss. Prasanna Usgaonker, **Mr. Amey Sawaikar, | 242-251 |
| 46. | **'जातक कथा' एक सामाजिक-सांस्कृतिक परिवर्तनातील भाषा**<br>श्री.निलेश बाजीराव काळे | 252-257 |
| 47. | **शिक्षण आणि रोजगार यांतील दरी : महाराष्ट्रीयन तरुणांची संक्रमणावस्था – एक समाजशास्त्रीय अभ्यास**<br>डॉ.सुनील व्यंकटेश सामग | 258-260 |
| 48. | **असंघटित क्षेत्रातील गिग श्रमिक**<br>डॉ. जान्हवी थोरात | 261-264 |
| 49. | **ग्रामीण शेतकऱ्यांचा सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक दर्जा - एक समाजशास्त्रीय अध्ययन**<br>डॉ. महेंद्र नारायणजी कुंभारे | 265-270 |
| 50. | **महाराष्ट्रातील ग्रामीण मुलींच्या शिक्षणाच्या घटत्या प्रमाणाचे समाजशास्त्रीय विश्लेषण**<br>श्री. जगदीश केशवराव ससाणे | 271-279 |
| 51. | **असंघटित क्षेत्रातील वीट भट्टी कामगारांच्या स्थितीचा अभ्यास**<br>सुजाता तुकाराम पाटील, प्रा. महेंद्रकुमार आनंदराव जाधव | 280-284 |
| 52. | **सामाजिक परिवर्तनात भाषेची भूमिका**<br>डॉ. मनीषा आझाद नायकवडी | 285-287 |
| 53. | **शहरीकरण आणि असमानता : एक चिकित्सक अभ्यास**<br>डॉ. संजय गंगाराम सुरेवाड | 288-290 |
| 54. | **डिजिटल युगातील सामाजिक परिवर्तन : एक समाजशास्त्रीय अभ्यास**<br>डॉ. कन्नाडे ममता कार्तिक | 291-298 |
| 55. | **कायदा, न्याय आणि मानवाधिकार : सामाजिक न्यायावर आधारित अंतरविज्ञाशाखीय दृष्टिकोन**<br>डॉ. दयानंद उत्तमराव राऊत | 299-303 |
| 56. | **डिजिटल समाजशास्त्र: डिजिटल तंत्रज्ञान आणि सोशल मीडियाचा समाजावर परिणाम**<br>प्रा. संगीता यशवंत पाटील | 304-308 |

Deliberative Research International Multidisciplinary Peer Reviewed & Refereed Journal/Volume-69/Issue-2/January-March, 2026, ISSN 0976-1136

# डिजिटल युगातील सामाजिक परिवर्तन : एक समाजशास्त्रीय अभ्यास

**डॉ. कन्नाडे ममता कार्तिक**
समाजशास्त्र विभागप्रमुख,
चंद्राबाई शांतप्पा शेंडुरे कॉलेज, हुपरी

---

**सारांश (Abstract):**

डिजिटल युगाने मानवी समाजाच्या रचना, संस्था, मूल्ये व नातेसंबंध यामध्ये मूलभूत परिवर्तन घडवून आणले आहे. संगणक, इंटरनेट, सोशल मीडिया, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि स्वयंचलन (Automation) यांच्या प्रभावामुळे शिक्षण, आरोग्य, रोजगार, प्रशासन व सामाजिक संवाद अधिक तंत्रज्ञानाधारित झाले आहेत. या संशोधन पेपरमध्ये डिजिटल युगातील सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप, सामाजिक संस्थांवरील परिणाम, डिजिटल दरी, तसेच संधी व आव्हाने यांचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करण्यात आला आहे. डिजिटल तंत्रज्ञान समाजाच्या विकासासाठी महत्त्वाचे साधन ठरत असले, तरी सामाजिक विषमता, गोपनीयतेचे प्रश्न व मानवी नातेसंबंधांतील बदल यांसारख्या समस्याही निर्माण होत आहेत. म्हणून डिजिटल परिवर्तनाचे समतोल व समावेशक मूल्यांकन करणे आवश्यक ठरते.

**कीवर्ड्स : डिजिटल युग, सामाजिक परिवर्तन, कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल दरी, समाजशास्त्र**

**प्रस्तावना:**

२१वे शतक हे डिजिटल युग म्हणून ओळखले जाते. माहिती व संवाद तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे समाजाच्या सर्वच क्षेत्रांमध्ये आमूलाग्र बदल घडून आले आहेत. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहता, डिजिटल क्रांती ही औद्योगिक क्रांतीइतकीच महत्त्वाची ठरली आहे (Deshpande, २०१८). डिजिटल तंत्रज्ञानामुळे सामाजिक व्यवहार वेगवान, जागतिक व तंत्रज्ञानाधारित झाले आहेत. त्यामुळे डिजिटल युगातील सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक ठरते.

**डिजिटल युग : संकल्पना**

डिजिटल युग म्हणजे माहितीची निर्मिती, साठवण, प्रक्रिया व प्रसार डिजिटल साधनांच्या माध्यमातून होणारा कालखंड होय.

याची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील-

डिजिटल युगामुळे माहितीचा जलद प्रसार करता येतो, जागतिक नेटवर्क तयार होते, वेळ व अंतराचे महत्त्व कमी होते, ऑनलाइन व्यवहारा वाढतो, स्वयंचलित व बुद्धिमान प्रणालींचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो.

**सामाजिक परिवर्तन : अर्थ**

सामाजिक परिवर्तन म्हणजे समाजाच्या रचना, मूल्ये, संस्था व संबंधांमध्ये होणारा दीर्घकालीन व महत्त्वपूर्ण बदल होय). डिजिटल युगातील सामाजिक परिवर्तन हे वेगवान, तंत्रज्ञानाधारित व जागतिक स्वरूपाचे आहे.

**समाजशास्त्रीय सिद्धांतांच्या आधारे विश्लेषण:**

समाजशास्त्रातील संघर्ष सिद्धांताच्या आधारे प्रस्तुत विषयाचा अभ्यास केला जाऊ शकतो. कारण डिजिटल संसाधनांवर वर्चस्व असलेल्या वर्गाला अधिक लाभ मिळतो. व ज्यांचे यावर वर्चस्व नसते त्यांना लाभापासून वंचित राहावे लागते.

**डिजिटल तंत्रज्ञान आणि सामाजिक संस्था:**

➢ **कुटुंब संस्था आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभाव:**

कुटुंब संस्था ही समाजाची मूलभूत आणि सर्वात प्राचीन सामाजिक संस्था मानली जाते. समाजीकरण, संस्कार, भावनिक आधार, आर्थिक सहकार्य आणि सामाजिक नियंत्रण ही कुटुंबाची प्रमुख कार्ये आहेत. परंतु डिजिटल युगाच्या आगमनानंतर—विशेषतः इंटरनेट, स्मार्टफोन, सोशल मीडिया, व्हिडिओ कॉल्स आणि डिजिटल मनोरंजनाच्या वाढत्या वापरामुळे—कुटुंब संस्थेच्या रचनेत, कार्यपद्धतीत आणि परस्पर नातेसंबंधांत लक्षणीय बदल घडून आले आहेत.

**१. कुटुंबातील संवादपद्धतीतील बदल-**

डिजिटल तंत्रज्ञानामुळे कुटुंबातील संवाद अधिक जलद, सुलभ आणि जागतिक स्वरूपाचा झाला आहे. व्हॉट्सॲप, झूम, गूगल मीट, फेसबुक, इंस्टाग्राम यांसारख्या माध्यमांमुळे भौगोलिक अंतर कमी झाले आहे. नोकरी, शिक्षण किंवा स्थलांतरामुळे दूर राहणारे कुटुंबीय व्हिडिओ कॉल्सद्वारे एकमेकांशी नियमित संपर्कात राहू शकतात. मात्र, या आभासी (virtual) संवादामुळे प्रत्यक्ष (face-to-face) संवादाचे प्रमाण कमी होत चालले आहे. घरातील सदस्य एकाच छताखाली राहत असूनही प्रत्येकजण स्वतंत्रपणे मोबाईल किंवा डिजिटल स्क्रीनमध्ये गुंतलेला दिसतो. यामुळे संवादाचे औपचारिक स्वरूप वाढले असून भावनिक खोली (emotional depth) कमी होत असल्याचे समाजशास्त्रज्ञांचे मत आहे.

**२. संयुक्त कुटुंब पद्धतीवर डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभाव-**

परंपरागत भारतीय समाजात संयुक्त कुटुंब पद्धतीला विशेष महत्त्व होते. परंतु डिजिटल तंत्रज्ञान, औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि रोजगाराच्या संधींमुळे विभक्त (एकत्र नसलेली) कुटुंब पद्धतीला चालना मिळाली आहे. डिजिटल साधनांमुळे व्यक्तीला स्वतंत्रपणे काम करणे, उत्पन्न मिळवणे आणि निर्णय घेणे शक्य झाले आहे. परिणामी, संयुक्त कुटुंबातील परस्परावलंबनकमी होत असून वैयक्तिक स्वातंत्र्याला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

**३. वैयक्तिक स्वातंत्र्यात वाढ-**

डिजिटल युगात कुटुंबातील प्रत्येक सदस्य—विशेषतः स्त्रिया आणि तरुण—स्वतंत्र निर्णय घेण्यास अधिक सक्षम झाला आहे. ऑनलाइन शिक्षण, वर्क फ्रॉम होम, डिजिटल बँकिंग आणि ई-गव्हर्नन्समुळे आर्थिक व सामाजिक स्वावलंबन वाढले आहे.

स्त्रियांना घरबसल्या रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्यामुळे पारंपरिक लिंगभुमिकांमध्ये बदल दिसून येतो. त्यामुळे कुटुंबातील सत्तासंबंध बदलत असून पितृसत्ताक रचनेला काही प्रमाणात आव्हान निर्माण झाले आहे.

**४. भावनिक अंतर वाढण्याची शक्यता-**

डिजिटल तंत्रज्ञानाने संवाद सुलभ केला असला, तरी तो संवाद अनेकदा वरवरचा ठरतो. सतत सोशल मीडियावर व्यस्त राहणे, डिजिटल मनोरंजनावर अवलंबून राहणे आणि प्रत्यक्ष संवादाला वेळ न देणे यामुळे कुटुंबातील सदस्यांमध्ये भावनिक अंतर वाढण्याची शक्यता निर्माण होते. विशेषतः वृद्ध पालक आणि तरुण पिढी यांच्यातील मूल्यसंघर्षअधिक तीव्र झाला आहे. वृद्धांना भावनिक सहवासाची अपेक्षा असते, तर तरुण पिढी डिजिटल जगात अधिक गुंतलेली असल्यामुळे हा संवाद तुटक स्वरूपाचा राहतो.

**५. पालक–मुलांमधील संवादावर परिणाम-**

डिजिटल तंत्रज्ञानाचा सर्वात महत्त्वाचा आणि संवेदनशील परिणाम पालक–मुलांच्या नात्यावर दिसून येतो. मुलांचे समाजीकरण पूर्वी कुटुंब, शाळा आणि समाज यांच्याद्वारे होत असे; परंतु आज डिजिटल माध्यमे—यूट्यूब, गेमिंग ॲप्स, सोशल मीडिया—मुलांच्या जीवनात प्रमुख समाजीकरणाची साधने ठरत आहेत. याचे काही सकारात्मक परिणाम असले, तरी अनेक नकारात्मक परिणामही दिसून येतात. जसे- पालक–मुलांमधील संवाद कमी होणे, पालकांचे नियंत्रण कमी होणे, मुलांमध्ये एकलकोंडेपणा वाढणे, आक्रमकता, स्क्रीन व्यसन आणि भावनिक अस्थैर्य, पालक डिजिटल साक्षर नसतील, तर generation gap अधिक वाढते. त्यामुळे पालक–मुलांमधील विश्वास आणि समजुतीवर परिणाम होतो.

एकूणच, डिजिटल तंत्रज्ञानामुळे कुटुंब संस्था पूर्णतः कमजोर झाली आहे असे म्हणता येणार नाही; मात्र तिचे स्वरूप, कार्य आणि नातेसंबंध बदलत आहेत.

➢ **शिक्षण संस्था आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभाव:**

शिक्षण संस्था ही समाजातील ज्ञाननिर्मिती, कौशल्यविकास आणि समाजीकरणाची प्रमुख संस्था आहे. डिजिटल युगात ऑनलाइन शिक्षण, ई-लर्निंग प्लॅटफॉर्म्स, डिजिटल क्लासरूम्स, MOOCs, Online Courses, स्मार्ट बोर्ड्स आणि शैक्षणिक ॲप्स यांमुळे शिक्षण प्रक्रियेत मूलभूत बदल झाले आहेत. विशेषतः कोविड-19 नंतर डिजिटल शिक्षणाला मोठ्या प्रमाणावर चालना मिळाली. डिजिटल तंत्रज्ञानामुळे शिक्षण वेळ, जागा आणि वयाच्या मर्यादांपासून मुक्त झाले आहे. विद्यार्थी घरबसल्या विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांचे अभ्यासक्रम शिकू शकतात. ई-लायब्ररी, डिजिटल नोट्स, व्हिडिओ लेक्चर्स आणि ऑनलाइन मूल्यांकनामुळे ज्ञानप्राप्तीच्या संधी

लक्षणीयरीत्या वाढल्या आहेत. त्यामुळे शिक्षण अधिक सुलभ, लवचिक आणि सर्वसमावेशक बनले आहे.

**१.शिक्षकाच्या भूमिकेतील बदल-**

पारंपरिक शिक्षणपद्धतीत शिक्षक हा ज्ञानाचा एकमेव स्रोत मानला जात असे. परंतु डिजिटल युगात शिक्षकाची भूमिका ज्ञानदाता (instructor) ऐवजी मार्गदर्शक, समन्वयक आणि सल्लागार (facilitator) अशी झाली आहे. विद्यार्थी स्वतः माहिती शोधून शिकत असल्यामुळे स्वयंअभ्यास (self-learning) आणि चिंतनशील शिक्षण (reflective learning) यांना प्रोत्साहन मिळाले आहे.

**२. डिजिटल दरी आणि शैक्षणिक असमानता-**

जरी डिजिटल शिक्षणाने अनेक संधी निर्माण केल्या असल्या, तरी डिजिटल साधनांची अनुपलब्धता असलेल्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षणातील दरी (educational divide) अधिक तीव्र झाली आहे. ग्रामीण भाग, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, आदिवासी समाज आणि मुली यांच्यासाठी इंटरनेट, स्मार्टफोन, संगणक आणि डिजिटल साक्षरतेचा अभाव ही मोठी समस्या ठरते.
परिणामी, डिजिटल तंत्रज्ञानामुळे शिक्षणात समानता निर्माण होण्याऐवजी काही प्रमाणात शैक्षणिक असमानता वाढल्याचे दिसून येते.

- **आर्थिक संस्था व रोजगारावर डिजिटल युगाचा प्रभाव**

आर्थिक संस्था समाजाच्या उत्पादन, वितरण आणि उपभोग प्रक्रियांशी संबंधित असतात. डिजिटल युगात ई-कॉमर्स, फिनटेक, गिग इकॉनॉमी, स्टार्टअप संस्कृती, वर्क फ्रॉम होम आणि स्वयंचलनामुळे आर्थिक संस्थांमध्ये आमूलाग्र बदल घडून आले आहेत.

**१.रोजगाराच्या स्वरूपातील बदल-**

डिजिटल तंत्रज्ञानामुळे पारंपरिक कायमस्वरूपी नोकऱ्यांऐवजी प्रकल्पाधारित, कराराधारित आणि फ्रीलान्स स्वरूपाचे रोजगार वाढले आहेत. ॲमेझॉन, फ्लिपकार्ट, स्विगी, झोमॅटो, उबर यांसारख्या प्लॅटफॉर्म्समुळे गिग इकॉनॉमीचा विस्तार झाला आहे. यामुळे रोजगाराच्या संधी वाढल्या असल्या, तरी रोजगाराचे स्वरूप अधिक अस्थिर बनले आहे.

**२. स्वयंचलन आणि रोजगार-**

कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स आणि स्वयंचलनामुळे उत्पादनक्षमता वाढली आहे; मात्र त्याच वेळी काही पारंपरिक नोकऱ्या नष्ट होत आहेत. विशेषतः अकुशल आणि अर्धकुशल कामगारांवर याचा विपरीत परिणाम झाला आहे. तथापि, डेटा ॲनालिटिक्स, सॉफ्टवेअर विकास, सायबर सुरक्षा, डिजिटल मार्केटिंग यांसारख्या क्षेत्रांत नवीन रोजगार संधी निर्माण झाल्या आहेत.

**3. कौशल्याधारित अर्थव्यवस्था-**

डिजिटल युगात अर्थव्यवस्था कौशल्याधारित बनत आहे. तांत्रिक कौशल्ये, डिजिटल साक्षरता, सर्जनशीलता आणि समस्या सोडवण्याची क्षमता यांना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

परिणामी, शिक्षण आणि रोजगार यांच्यातील संबंध अधिक घट्ट झाला असून आयुष्यभर शिक्षण (lifelong learning) ही संकल्पना पुढे आली आहे.

➢ **राजकीय व प्रशासकीय संस्थांवर डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावः**

राजकीय व प्रशासकीय संस्था समाजातील सत्ता, प्रशासन, धोरणनिर्मिती आणि लोकसेवा यांचे नियमन करतात. डिजिटल युगात ई-गव्हर्नन्स, डिजिटल सेवा, ऑनलाइन अर्ज प्रणाली, डिजिटल मतदान आणि सोशल मीडिया यांमुळे शासनव्यवस्थेचे स्वरूप बदलले आहे.

**१.ई-गव्हर्नन्स आणि प्रशासनातील सुधारणा-**

ई-गव्हर्नन्समुळे सरकारी सेवा अधिक पारदर्शक, कार्यक्षम आणि नागरिक-केंद्रित झाल्या आहेत. आधार, डिजिलॉकर, उमंग, ऑनलाइन कर भरणा, शिष्यवृत्ती पोर्टल्स यांसारख्या उपक्रमांमुळे वेळ, खर्च आणि भ्रष्टाचार कमी करण्यास मदत झाली आहे. नागरिकांचा शासनाशी थेट संवाद वाढला आहे.

**२. लोकशाही प्रक्रियेत बदल-**

सोशल मीडिया आणि डिजिटल माध्यमांमुळे राजकीय जनजागृती वाढली आहे. नागरिक आपले मत व्यक्त करू शकतात, प्रश्न उपस्थित करू शकतात आणि राजकीय सहभाग वाढवू शकतात. त्यामुळे लोकशाही अधिक सहभागी बनल्याचे दिसून येते.

**3. डेटा सुरक्षा व गोपनीयतेचे प्रश्न-**

डिजिटल प्रशासनामुळे मोठ्या प्रमाणावर नागरिकांचा वैयक्तिक डेटा संकलित केला जात आहे. त्यामुळे डेटा सुरक्षा, गोपनीयता, सायबर गुन्हेगारी आणि डिजिटल देखरेख यांसारखे गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. डिजिटल साक्षरतेचा अभाव असलेल्या नागरिकांसाठी हे धोके अधिक आहेत. म्हणूनच, मजबूत कायदे, नैतिक धोरणे आणि तांत्रिक सुरक्षा उपायांची गरज अधोरेखित होते.

शिक्षण, अर्थव्यवस्था आणि प्रशासन या प्रमुख सामाजिक संस्थांवर डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभाव बहुआयामी आहे. एका बाजूला संधी, कार्यक्षमता आणि समावेशन वाढले आहे; तर दुसऱ्या बाजूला डिजिटल दरी, असमानता, असुरक्षा आणि नैतिक प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यामुळे डिजिटल परिवर्तनाचा लाभ सर्व समाजघटकांपर्यंत समानरीत्या पोहोचवण्यासाठी समावेशक धोरणे आणि सामाजिक जाणीव आवश्यक आहे.

➢ **डिजिटल माध्यमे आणि सामाजिक संबंध-**

डिजिटल युगात सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स—जसे की फेसबुक, व्हॉट्सॲप, इंस्टाग्राम, ट्विटर, यूट्यूब—यांनी सामाजिक संवादाचे स्वरूप आमूलाग्र बदलले आहे. पारंपरिक समाजात सामाजिक संबंध प्रत्यक्ष भेटी, सामूहिक उपक्रम आणि स्थानिक समुदायांवर आधारित होते; मात्र डिजिटल माध्यमांमुळे संवाद अधिक आभासी (virtual), तात्काळ आणि जागतिक झाला आहे.

**सामाजिक संबंधांच्या स्वरूपातील बदल-**

डिजिटल माध्यमांमुळे व्यक्ती एकाच वेळी अनेक लोकांशी संपर्कात राहू शकते. भौगोलिक अंतराचा अडथळा कमी झाला असून मैत्री, नातेसंबंध आणि व्यावसायिक संपर्कांचे जाळे विस्तारले आहे. तथापि, या आभासी नातेसंबंधांमुळे प्रत्यक्ष सामाजिक सहभाग कमी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

समाजशास्त्रज्ञांच्या मते, डिजिटल संवादामध्ये भावनिक खोली कमी असून नातेसंबंध अधिक तात्पुरते आणि औपचारिक बनत चालले आहेत.

**डिजिटल माध्यमांचे सकारात्मक सामाजिक परिणाम:**

- **सामाजिक जागरूकतेत वाढ**

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्समुळे सामाजिक प्रश्नांबाबत जनजागृती मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. लैंगिक समानता, पर्यावरण संरक्षण, मानवाधिकार, जातीय भेदभाव, आरोग्यविषयक जाणीव यांसारख्या विषयांवर माहिती वेगाने पसरते. त्यामुळे नागरिक अधिक सजग आणि माहितीपूर्ण बनत आहेत.

- **सामाजिक चळवळींना वेग**

डिजिटल माध्यमांनी सामाजिक चळवळींना नवे बळ दिले आहे. ऑनलाइन मोहिमा, हॅशटॅग चळवळी आणि डिजिटल आंदोलनांमुळे लोकांचे संघटन सुलभ झाले आहे. #MeToo, पर्यावरण चळवळी, विद्यार्थी आंदोलन यांसारख्या चळवळींना सोशल मीडियामुळे जागतिक स्वरूप प्राप्त झाले आहे.

**डिजिटल माध्यमांचे नकारात्मक सामाजिक परिणाम:**

- **अफवा आणि चुकीची माहिती**

डिजिटल माध्यमांवरील माहिती अनेकदा पडताळणीविना प्रसारित होते. अफवा, खोटी बातमी (fake news) आणि द्वेषमूलक मजकूर समाजात गैरसमज, भीती आणि सामाजिक तणाव निर्माण करतो. याचा परिणाम सामाजिक ऐक्य (social cohesion) आणि लोकशाही प्रक्रियांवर होतो.

- **मानसिक ताणतणाव**

सोशल मीडियावरील सतत तुलना, आभासी प्रतिमा आणि 'लाईक्स–कॉमेंट्स' यांवर आधारित मान्यता यामुळे व्यक्तींमध्ये मानसिक ताणतणाव, न्यूनगंड आणि एकलकोंडेपणा वाढतो. विशेषतः तरुण पिढी मानसिक आरोग्याच्या समस्यांना अधिक सामोरी जात आहे.

- **सामाजिक ध्रुवीकरण**

अल्गोरिदम-आधारित सोशल मीडिया वापरामुळे व्यक्ती समान विचारसरणीच्या लोकांपुरती मर्यादित राहते. परिणामी, भिन्न मतांचा स्वीकार कमी होऊन सामाजिक ध्रुवीकरण वाढते. समाजात 'आपण' आणि 'ते' अशी विभागणी तीव्र होते.

➢ **डिजिटल युग आणि सामाजिक विषमता (डिजिटल दरी):**

डिजिटल युगाने अनेक संधी निर्माण केल्या असल्या, तरी त्या सर्व समाजघटकांपर्यंत समानरीत्या पोहोचलेल्या नाहीत. डिजिटल दरी (Digital Divide) म्हणजे तंत्रज्ञानाच्या उपलब्धता, वापर, कौशल्य आणि लाभ यांमधील असमानता होय. त्यामुळे डिजिटल युग सामाजिक विषमता कमी करण्याऐवजी काही प्रमाणात ती वाढवत असल्याचे स्पष्ट होते.

**डिजिटल दरीचे प्रकार**

**1) ग्रामीण–शहरी डिजिटल दरी**

शहरी भागात इंटरनेट सुविधा, डिजिटल सेवा आणि तांत्रिक पायाभूत सुविधा तुलनेने अधिक उपलब्ध आहेत; तर ग्रामीण भागात इंटरनेट वेग, वीजपुरवठा आणि डिजिटल साधनांची कमतरता आढळते. परिणामी, ग्रामीण नागरिक डिजिटल सेवांपासून वंचित राहतात.

**2) श्रीमंत–गरीब डिजिटल दरी**

आर्थिकदृष्ट्या सक्षम वर्गाकडे स्मार्टफोन, संगणक, उच्चगती इंटरनेट आणि डिजिटल कौशल्ये उपलब्ध असतात; तर गरीब वर्गासाठी ही साधने परवडणारी नसतात. त्यामुळे शिक्षण, रोजगार आणि माहितीच्या संधींमध्ये असमानता वाढते.

**3) लिंग आधारित डिजिटल दरी**

अनेक समाजांमध्ये स्त्रियांना डिजिटल साधनांपर्यंत मर्यादित प्रवेश मिळतो. सामाजिक निर्बंध, शिक्षणाचा अभाव आणि आर्थिक अवलंबित्वामुळे स्त्रिया डिजिटल सेवांचा कमी वापर करतात.

**4) शैक्षणिक डिजिटल दरी**

शिक्षणाचा स्तर जितका उच्च, तितका डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर अधिक प्रभावी दिसून येतो. कमी शिक्षित व्यक्तींना डिजिटल सेवा समजून घेणे आणि वापरणे कठीण जाते. परिणामी, माहिती व ज्ञानाच्या लाभांपासून ते वंचित राहतात.

- **डिजिटल दरीचे सामाजिक परिणाम**

डिजिटल दरीमुळे समाजात संधींची असमानता, सामाजिक बहिष्कार आणि नवीन प्रकारची विषमता निर्माण होत आहे. डिजिटल शिक्षण, ई-गव्हर्नन्स आणि ऑनलाइन रोजगाराच्या संधी काही विशिष्ट वर्गांपुरत्याच मर्यादित राहतात. त्यामुळे डिजिटल तंत्रज्ञान हे सामाजिक परिवर्तनाचे साधन ठरण्याऐवजी काही वेळा सामाजिक विभाजनाचे साधन बनते.

**निष्कर्ष**

डिजिटल युगातील सामाजिक परिवर्तन ही बहुआयामी प्रक्रिया आहे. डिजिटल तंत्रज्ञान समाजाच्या विकासासाठी महत्त्वाचे साधन ठरत असले, तरी त्याचे परिणाम सर्वांसाठी समान नाहीत. सामाजिक न्याय, समावेशन आणि मानवी मूल्यांचा समतोल राखल्यास डिजिटल युग अधिक सकारात्मक आणि समतावादी ठरू शकते. म्हणूनच डिजिटल परिवर्तनाचे नियोजन समाजकेंद्रित व मूल्याधारित असणे आवश्यक आहे.

## संदर्भसूची (References)

१. देशपांडे, शरद. (2018). तंत्रज्ञान आणि समाज. पुणे : कॉन्टिनेंटल प्रकाशन.

२. पाटील, डॉ. सुभाष. (2020). समाजशास्त्र आणि माहिती तंत्रज्ञान. औरंगाबाद : विद्या प्रकाशन.

३. कुलकर्णी, डॉ. संजय. (2019). डिजिटल भारत : संधी आणि आव्हाने. मुंबई : ग्रंथाली.

४. भारत सरकार. (2016). डिजिटलइंडिया उपक्रम अहवाल. नवी दिल्ली : माहिती व प्रसारण मंत्रालय.

५. जागतिक बँक. (2016). डिजिटल डिव्हिडंड्स अहवाल. वॉशिंग्टन डी.सी.